follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

www.rajdand.com

। पश्चिम महाराष्ट्र ।

RNI Regd No.72105/99 ✻ वर्ष २५ ✻ अंक २७३ ✻ सातारा ✻ सातारा ✻ रविवार दि. १६ जून २०२४ ✻ पाने ८ ✻ किंमत ५ रू/

## महायुतीत खडे टाकण्याचे काम करू नका : राष्ट्रवादी प्रवक्त्यांचा इशारा

**मुंबई :** राष्ट्रीय स्वयंसेवक संघांचे मुखपत्र असलेल्या ऑर्गनायझर मध्ये करण्यात आलेल्या टीकेवरून राष्ट्रवादी काँग्रेसच्या बुजुर्ग नेत्यांकडून संयत प्रतिक्रिया व्यक्त होत असली तरीही नव्या दमाच्या नेत्यांकडून तीव्र प्रतिक्रिया येत आहेत. महायुतीशी थेट संबंध नसलेल्या संघाच्या विचारवंतांनी महायुतीटखडे टाकण्याचे काम करू नये, असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रवक्ते आणि युवक प्रदेशाध्यक्ष सूरज चव्हाण यांनी दिला आहे.

महाराष्ट्रात भाजप आणि शिवसेना शिंदे गट पूर्ण बहुमतात असताना अजित पवार यांना सोबत घेण्याची काय गरज होती, असा सवाल ऑर्गनायझर मधील लेखात करण्यात आला आहे आगामी दोन-तीन वर्षात अंतर्गत दुपारीमुळेच शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसची शक्ती क्षीण झाली असती, असा दावाही या लेखात करण्यात आला आहे.

निवडणुकीत चांगले यश मिळाले तर त्याचे श्रेय राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या उत्तम नियोजनाला, आणि अपयश पदरी पडले तर त्याचे अपश्रेय अजित पवार यांना, असा दुटप्पीपणाचा चालणार नाही. लिहिता बोलता आम्हालाही येते, अशा शब्दात सूरज चव्हाण यांनी आपला संताप व्यक्त केला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी मात्र, हा लेख आपण वाचला नसल्याचे संगत संयत प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. संघाची भूमिका काहीही असली तरीही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यापासून भारतीय जनता पक्षाच्या कोणत्याही नेत्याच्या मनात राष्ट्रवादी काँग्रेसला महायुतीत सामावून घेतल्या बाबत खेद अथवा पश्चातापाची भावना दिसून येत नाही. शपथविधीच्या निमित्ताने झालेल्या दिल्ली दौऱ्यात गृहमंत्री अमित शहा, राजनाथ सिंह यांच्यापासून अनेक दिग्गज भाजप नेत्यांच्या भेटी गाठी आणि बैठका झाल्या. त्यात कोणाकडूनही नाराजी व्यक्त करण्यात आलेली नाही, असे तटकरे यांनी स्पष्ट केले. आगामी विधानसभा निवडणूक आपण महायुती म्हणून एकसंध पणाने लढू, असेही त्यांनी सांगितले.

# महाविकास आघाडी विधानसभा निवडणूक एकत्रीत लढणार !

**मुंबई :** महाविकास आघाडीने आगामी विधानसभा निवडणूक पूर्ण ताकदीने एकत्रित लढवण्याचा निर्णय घेतला आहे.

आज महाविकास आघाडीची संयुक्त पत्रकार परिषद झाली. पत्रकार परिषद बोलताना आगामी विधानसभा निवडणूकही पूर्ण ताकदीने लढणार असल्याची घोषणा माजी मुख्यमंत्री आणि काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी आज महाविकास आघाडीच्या संयुक्त पत्रकार परिषदेत केली. त्यामुळे गेल्या काही दिवसांपासून काँग्रेस आणि ठाकरे गटाकडून स्वबळाचा नारा देण्यात येत होता, त्या चर्चेला पूर्णविराम मिळाला आहे. मविआच्या संयुक्त पत्रकार परिषदेसाठी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार, संजय राऊत,




जयंत पाटील, आदित्य ठाकरे, बाळासाहेब थोरात, जितेंद्र आव्हाड, खासदार अनिल देसाई, अरविंद सावंत, वंदना चव्हाण उपस्थित होत्या. यावेळी बोलताना उद्धव ठाकरे, शरद पवार यांनी भाजपसह मोदींचा चांगलाच समाचार घेतला. महाविकास आघाडीकडून निवडणुकीत मदत करणाऱ्या प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष घटकांचे आभार मानण्यात आले.

पृथ्वीराज चव्हाण बोलताना म्हणाले की ही पत्रकार परिषद महाराष्ट्र जनतेचा आभार मानण्यासाठी आहे. लोकशाही वाचवण्यासाठी महाराष्ट्रात जनतेने घवघवीत यश महाविकास आघाडीला मिळवून दिले.

अनेक संघटनांनी छोट्या पक्षांनी वातावरण निर्मितीसाठी मदत केल्याचेही पृथ्वीराज चव्हाण यांनी विशेष करून नमूद केले. लोकशाही वाचवण्यासाठी जनतेने आम्हाला मत दिल्याचंही त्यांनी सांगितलं. प्रचंड धनशक्ती विरोधात ही निवडणूक आम्ही लढवली आणि यश मिळवल्याचं त्यांनी नमूद केले. या निवडणुकीच्या माध्यमातून शेतकरी बांधवांनी सुद्धा एक संदेश दिला आहे. धार्मिक ध्रुवीकरणाचा प्रयत्न सुद्धा झाला. मात्र, तो यशस्वी झाला नसल्याचेही पृथ्वीराज चव्हाण यावेळी म्हणाले. त्याचबरोबर उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांनी जवळपास प्रत्येक मतदारसंघांमध्ये प्रचार केल्याचा विशेष उल्लेख पृथ्वीराज चव्हाण यावेळी यांनी बोलताना केला. आज तीन पक्षांची प्राथमिक बैठक झाली. ही बैठक विधानसभेची पूर्वतयारीच्या अनुषंगानेच होती. लोकसभेसाठी आम्ही ज्या पद्धतीने लढलो त्यापेक्षा अधिक ताकदीने लोकांचे प्रश्न मांडून विधानसभेमध्ये सुद्धा बदल करू, असा विश्वास पृथ्वीराज चव्हाण यांनी व्यक्त केला.

दरम्यान, शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यावेळी बोलताना म्हणाले की, आज आमची एक बैठक झाली.

पुढील निवडणूक सुद्धा एकत्रित लढणार आहोत. त्यांनी सांगितले की, महाराष्ट्र जनतेचे आभार मानतो. युट्युब आणि संघटनानी सुद्धा विचार मांडले. संविधान आणि लोकशाही वाचविण्यासाठी ही लढाई होती.

### शरद पवारांचा मोदींना टोला

**राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी सांगितले की, देशाच्या पंतप्रधान मोदी यांनी राज्यात १८ सभा घेतल्या. एक रोड शो सुद्धा झाला. विधानसभेला सुद्धा जेवढ्या त्यांच्या सभा होतील तेवढा आम्हाला फायदा होईल, अशा शब्दात शरद पवार यांनी पीएम मोदी यांच्या प्रचारसभांवरून टोला लगावला.**

## फ्रान्सच्या राष्ट्रीय ग्रंथालयात सापडली शिवकालीन इतिहासाची बखर

**पुणे :** फ्रान्सच्या राष्ट्रीय ग्रंथालयात दोघा मराठमोळ्या इतिहास अभ्यासकांना छत्रपती शिवरायांच्या विजयगाथेपासून छत्रपती संभाजी महाराजांच्या कारकिर्दीच्या सुरुवातीपर्यंत ऐतिहासिक तपशील असलेली अप्रकाशित बखर सापडली आहे. ही बखर आतापर्यंत उपलब्ध असलेल्या ९१ कलमी बखरींच्या आधीची असल्याचा या संशोधकांचा दावा आहे.

मूळचे कोल्हापूरचे आणि सध्या पुण्यात स्थायिक असलेले गुरुप्रसाद कानिटकर आणि पुणे येथील मनोज गाणी या दोन मराठमोळ्या इतिहास अभ्यासकांना फ्रान्सच्या राष्ट्रीय ग्रंथालयात जुनी कागदपत्र पहात असताना मोडी लिपीतील एक हस्तलिखित आढळून आले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळाचे वर्णन करणारी की अप्रकाशित बखर असल्याचे या अभ्यासाकांना दिसून आले.

या बखरीत छत्रपती शिवाजी महाराजांची संपूर्ण कारकीर्द कथन करण्यात आली आहे. त्यामध्ये अफजलखान वधाचे सविस्तर वर्णन आहे. त्याचप्रमाणे छत्रपती शिवराय आणि महाराणी सईबाई यांच्यातील संवादाचाही त्यामध्ये उल्लेख आहे. छत्रपती संभाजी महाराजांच्या कारकिर्दीच्या सुरुवातीच्या काळातील वर्णनही या बखरीत आले आहे.

थोरले बाजीराव पेशवे यांचे बंधू चिमाजी अप्पा यांनी जंजिऱ्याच्या सिद्दीवर केलेल्या आक्रमणाच्या नंतर, अर्थात सन १७४० नंतर ही मोडी लिपीतील बखर लिहिली गेली असावी, असा या संशोधकांचा कयास आहे.

## मोदी जितक्या जास्त सभा घेतील तितका आमचा विजय सोपा : शरद पवार यांनी घेतली भाजपची फिरकी



**बई :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लोकसभा निवडणुकीच्या काळात जिथे जिथे सभा घेतल्या त्या त्या ठिकाणी महाविकास आघाडीच्या उमेदवारांना मताधिक्य मिळाले. त्यामुळे त्यांना धन्यवाद देणे मी माझे कर्तव्य समजतो, अशा शब्दात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी मोदी यांच्यासह भारतीय जनता पक्ष आणि महायुतीची खिल्ली उडवली. विधानसभा निवडणुकीत देखील पंतप्रधान जितक्या जास्त सभा घेतील, तितका आमचा विजय सुलभ होऊ शकेल, असेही पवार म्हणाले.

नुकत्याच पार पडलेल्या लोकसभा निवडणुकीत उल्लेखनीय कामगिरी केल्यानंतर महाविकास आघाडीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत पवार बोलत होते. यावेळी शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे, संजय राऊत, काँग्रेसचे पृथ्वीराज चव्हाण, बाळासाहेब थोरात, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्यासह महाविकास आघाडीचे अनेक नेते उपस्थित होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे महायुतीचे सर्वात मोठे स्टार प्रचारक होते. त्यांनी राज्यात १८ सभा घेतल्या. मुंबईत रॅलीचे ही आयोजन करण्यात आले. पंतप्रधान मोदी यांनी ज्या ज्या ठिकाणी सभा घेतल्या त्या त्या ठिकाणी मतदारांनी आमच्या उमेदवारांना मोठ्या प्रमाणावर मतदान केले, ही बाब पवार यांनी पत्रकारांच्या लक्षात आणून दिली. विधानसभा निवडणुकीत पंतप्रधान मोदी जितक्या जास्त सभा घेतील इतकी आमची बहुमताकडे वाटचाल सोपी होईल, असा टोलाही पवार यांनी लगावला.

मोदी यांच्या सर्वांचा स्ट्राइक रेट मांडत पवार यांनी मोदी यांची लोकप्रियता आणि करिश्मा यावरच प्रश्नचिन्ह उभे केले आहे. महाराष्ट्रात आणि देशभरात मागील लोकसभा निवडणुकीच्या तुलनेने भाजप आणि राष्ट्रीय लोकशाही आघाडीची कामगिरी खालावली आहे. त्यामुळे एकूणच देशभरातील पंतप्रधान मोदी यांचा प्रभाव उचलत असल्याची चर्चा सुरू झाली आहे.

### या सगळ्यांच्यात बसून सांगू का?

**नरेंद्र मोदी पंतप्रधान झाल्यावर उद्धव ठाकरे पुन्हा त्यांच्याबरोबर जातील, असे विधान रवी राणा यांनी केले होते. त्याबाबत ठाकरे यांच्याकडे या पत्रकार परिषदेत विचारणा केली असता त्यांनी दिलेल्या मिश्किल उत्तरावर नेत्यांच्या आणि पत्रकारांच्यातही हास्याचे फवारे उडाले. समजा मला जायचे असले तरी आता यांच्यात बसून सांगू का, असा सवाल ठाकरे यांनी प्रश्नकर्त्याला केला.**

## मनसे स्वबळावर लढणार विधानसभा निवडणूक




**मुंबई :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना तिसऱ्यांदा पंतप्रधान करण्यासाठी महायुतीला बिनशर्त पाठिंबा देणाऱ्या महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने आगामी विधानसभा निवडणुकीत 'एकला चलो रे,' हे धोरण अमलात आणण्याची तयारी सुरू केली आहे. त्या दृष्टीने पक्षप्रमुख राज ठाकरे यांनी आपल्या पदाधिकाऱ्यांना तब्बल अडीचशे जागांवर कामाला लागण्याचे आदेश दिले आहेत.

लोकसभा निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर राज्यातील सर्व राजकीय पक्षांनी विधानसभा निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. मात्र, महायुती आणि महाविकास आघाडी या दोघांचेही घटक पक्षातील जागा वाटपाचे धोरण अथवा सूत्र अद्याप निश्चित झालेले नाही, ही बाब राज ठाकरे यांनी आपल्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत निदर्शनास आणून दिली. मी कोणत्याही पक्षाकडे किंवा युती, आघाडीकडे जागा मागण्यासाठी किंवा जागा वाटपाची बोलणी करण्यासाठी जाणार नाही, असे राज ठाकरे यांनी स्पष्ट केले.

शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांच्या पक्षाला मिळालेली मते ही त्यांची स्वतःची मते नसून मोदी विरोधकांनी आपली मते त्यांच्या पारड्यात टाकली आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेना निवडणुकीच्या रिंगणात कधी उतरणार, याची मराठी माणूस वाट पाहत आहे. उद्धव ठाकरे यांच्या बद्दल लोकांच्या मनात राग असून मराठी माणसाचा पाठिंबा मनसेला निश्चितपणे मिळेल, असा विश्वास राज ठाकरे यांनी व्यक्त केला.

सध्या विधानसभेत भारतीय जनता पक्षाकडे १०५ आमदारांचे संख्याबळ आहे. शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट या दोन्ही पक्षांचे ४०-४० आमदार आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस आणि शिवसेना या दोन्ही पक्षांनी भाजपाकडे तब्बल ८० ८० जागांची मागणी केली आहे. त्यात मनसेने महायुतीत दाखल होऊन विधानसभा निवडणुकीत मतदार संघाची मागणी केली तर कितीशा जागा पदरात पडणार, असा विचार करून राज ठाकरे यांनी स्वबळाचा नारा दिला आहे, असे सूत्रांनी स्पष्ट केले.

# पहिल्याच दिवशी झोपमोड

## प्राथमिक शाळा सकाळी नऊनंतर भरविण्याच्या निर्णयाला केराची टोपली



**पुणे :** उन्हाळ्याच्या सुट्टीनंतर सरकारी, अनुदानित शाळा आज, शनिवारी (१५ जून) सुरू होत आहेत. आजच्या पहिल्याच दिवशी अनेक प्राथमिक शाळांनी चिमुकल्यांच्या वयाचा विचार न करता पुन्हा सकाळी सात वाजता शाळा भरवून त्यांची झोपमोड करण्याचे ठरवले आहे. इतर मंडळांच्या खासगी शाळांनीही सात वाजता शाळा भरवण्याचे ठरवले आहे. शालेय शिक्षण विभागाने ज्युनिअर केजी (पूर्व प्राथमिक) ते चौथीपर्यंतच्या शाळा सकाळी नऊनंतर भरविण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, केवळ शिक्षणसंस्थांच्या आणि शाळांच्या फायद्यासाठी शाळा सकाळी सात ते आठ वाजतांच्या दरम्यान सुरू करण्याचा अट्टाहास धरण्यात येत आहे.

विदर्भ वगळता राज्यातील शाळा आज, शनिवारपासून सुरू होत आहेत. पुणे, मुंबई, संभाजीनगर, नागपूर, नाशिक, कोल्हापूर या शहरांमध्ये पूर्व प्राथमिक आणि प्राथमिक शाळा सकाळी सातच्या सुमारास भरतात. या शाळांमध्ये वेळेत पोहोचण्यासाठी लहान मुलांना सकाळी लवकर उठून, तयारी करून स्कूलबस पकडावी लागते. त्याचप्रमाणे पालकांनाही डबा तयार करणे, मुलांची तयारी करून देणे आदींसाठी सकाळी पाच वाजल्यापासूनच उठावे लागते. यात त्यांची ओढाताण होते. अशा परिस्थितीत लहान मुलांची झोप पूर्ण होत नाही. याचा परिणाम त्यांच्या वर्गातील उपस्थितीसोबतच, त्यांच्या अध्यापनावर होतो. झोप पूर्ण न झाल्याने, मुले चिडचिड करीत असल्याचे चित्र पाहायला मिळते. यावर उपाय म्हणून लहान मुलांची झोप पूर्ण होऊन त्यांच्या मेंदूच्या विकासाला चालना मिळावी, यासाठी सर्व व्यवस्थापनाच्या आणि माध्यमांच्या चौथीपर्यंतच्या शाळा सकाळी नऊनंतर सुरू करण्याचा निर्णय शिक्षण विभागाने फेब्रुवारीत जाहीर केला. त्यानुसार शाळांना येत्या शैक्षणिक वर्षापासून अंमलबजावणी करण्याचे आदेश दिले. मात्र, या निर्णयाकडे शिक्षणसंस्थांनी आणि शाळांनी दुर्लक्ष केल्याचे चित्र आहे.

## लोकसभा निवडणुकीत इंडिया आघाडीला सर्वाधिक बळ महाराष्ट्राने दिले; जयंत पाटील स्पष्टच बोलले

**मुंबई :** लोकसभा निवडणुकीत राज्यात महायुतीला चितपट केल्यानंतर आतामहाविकास आघाडीच्यानेत्यांनी एक संयुक्त पत्रकार परिषद घेत आगामी विधानसभा निवडणुकीसाठी काय योजना असेल, याबाबत काही मते मांडली आहेत. या पत्रकार परिषदेत महाविकास आघाडीच्या नेत्यांनी भाजपा आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर हल्लाबोलही केला. यातच राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे नेतेजयंत पाटीलयांनी राष्ट्रीय पातळीवरील इंडिया आघाडीला महाराष्ट्रातील सर्वाधिक बळ मिळाल्याचे म्हटले आहे.

पत्रकारांशी बोलतानाजयंत पाटीलम्हणाले की, आपल्या महाविकास आघाडीने लोकसभेत घवघवित यश मिळवले. त्यानंतर आपल्यासमोर पहिल्यांदाच एकत्रितपणे येत आहोत. महाराष्ट्राने बजावलेली भूमिका अतिशय महत्वाची ठरली आहे. राष्ट्रीय पातळीवरील इंडिया आघाडीला जे बल महाराष्ट्रातील जनतेने दिल आहे. महाराष्ट्रामध्ये निवडणुका कशा झाल्या याचा अंदाज आपल्याला आला आहे, असे जयंत पाटील यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले.लोकशाही वाचवण्यासाठी सर्व जनतेने मोठे पाऊल उचललेजनतेने इंडिया आघाडीला जे मतदान केले त्यात महाराष्ट्रातील जनतेचा मोठा वाटा आहे. लोकशाही वाचवण्यासाठी सर्व जनतेने मोठे पाऊल उचलले आहे. धार्मिक ध्रुवीकरण कुठेही पसरलेले नाही. महविकास आघाडीला जनतेने पाठिंबा दिला. लवकरात लवकर विधानसभेच्या दृष्टीने



निर्णय घेणार आहोत. ज्याप्रकारे लोकसभेची निवडणूक झाल्या. त्याच ताकतीने विधानसभेच्या निवडणुका लढणार आहे. आम्हाला खात्री आहे. ज्याप्रमाणे लोकसभा निवडणुकीत जनतेचा आशीर्वाद मिळाला, त्याच्यापेक्षा अधिक प्रमाणात विधानसभा निवडणुकीत आशीर्वाद मिळेल, असा दावा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी केला. दरम्यान, जनतेला सत्य काय आहे हे कळत गेले. संविधान आणि लोकशाही वाचवण्यासाठी ही लढाई होती. हा विजय अंतिम नाही ही लढाई सुरू झाली आहे. यानंतर विधानसभा आणि अनेक निवडणूका येतील. एनडीए हे सरकार किती दिवस चालेल हा मोठा प्रश्न आहे. देशाची जनता निवडणुकीच्या वेळी जागी झाली असे आम्ही मानतो, असे उद्धव ठाकरे म्हणाले.

# संपादकीय

## 'नीट' च्या पावित्र्याला कलंक

गेल्या काही वर्षांपासून वैद्यकीय प्रवेश परीक्षा घेणाऱ्या 'नॅशनल टेस्ट एजन्सी' (एनटीए)या संस्थेची विश्वासार्हता धोक्यात आली आहे. परीक्षा घेण्यासाठी अर्ज स्वीकारण्यापासून ही संस्था वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. जयपूर उच्च न्यायालय आणि सर्वोच्च न्यायालयाने समुपदेशन थांबवलेले नसले, तरी ज्या पद्धतीने 'नीट' परीक्षा घेतल्या आणि वाढीव गुणांमुळे जो गोंधळ घातला, त्यावरचे भाष्य कान उघडणारे आहे. केंद्र सरकार भलेही 'नीट' परीक्षेत गैरव्यवहार झाला नाही असे म्हणत असले, तरी त्यावर शेंबडे पोरही विश्वास ठेवणार नाही. सर्वोच्च न्यायालयाने 'एनटीए'ला ग्रेस गुण दिलेल्या १५६३ विद्यार्थ्यांची गुणपत्रिका रद्द करून त्यांची पुनर्परीक्षा घेण्याचे निर्देश दिले आहेत. ही परीक्षा २३ जून रोजी होणार आहे. १५६३ मुलांना वाढीव गुण का दिले, या प्रश्नाचे उत्तर 'एनटीए'ला देता आले नाही. 'एनटीए'ने वाढीव गुण दिलेल्या विद्यार्थ्यांना दोन पर्याय दिले आहेत. हे विद्यार्थी पुन्हा परीक्षेला बसू शकतात किंवा त्यांच्या जुन्या गुणांसह समुपदेशनासाठी पुढे जाऊ शकतात; परंतु त्यांच्या गुणपत्रिकेतून अतिरिक्त गुण काढून टाकले जातील. ज्या उमेदवारांना आपण पुनर्परीक्षेत चांगली कामगिरी करू शकतो, असा आत्मविश्वास आहे, ते पुनर्परीक्षेला बसण्याचा निर्णय घेऊ शकतात. 'नीट' निकालाच्या प्रतीक्षेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी आणि त्यांच्या कुटुंबीयांसाठी चार जूनची रात्र गोंधळाचे कारण बनली. सुमारे सोळाशे मुलांना उच्च श्रेणी मिळाली. नंतर जेव्हा ६७ मुलांना शंभर टक्के गुण मिळाल्याचे उघड झाले, तेव्हा सुरुवातीला लोकांना आश्चर्य वाटले. नंतर त्यांना या परीक्षेत हेराफेरीचा संशय येऊ लागला. 'नीट' परीक्षेच्या अर्ज भरण्यास अनाकलनीय वाढ देण्यात आली, तसेच ठरलेल्या तारखेच्या दहा दिवस आधीच 'नीट'चा निकाल लागल्याने अनेकांचा एकूणच परीक्षा घेण्याच्या पद्धतीबद्दल आक्षेप आहे. विद्यार्थी देशभर रस्त्यावर उतरले. सर्वोच्च न्यायालयालाही त्याची दखल घ्यावी लागली. 'नीट'चा निकाल जाहीर करण्यासाठी निवडणूक निकालाचा दिवस निवडला नसता, तर कदाचित ६७ मुलांचे शंभर १०० टक्के गुण हा प्रतिभेचा स्फोट मानला गेला असता. जसजशी माहिती समोर येऊ लागली, तसतसे परीक्षेच्या निकालाबाबत प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत.

राष्ट्रीय स्तरावरील प्रवेश परीक्षांमध्ये पारदर्शकता आणण्यासाठी सरकारने 'नॅशनल टेस्टिंग एजन्सी' (एनटीए) ची स्थापना केली होती. संसदेच्या कायद्याने निर्माण केलेल्या या स्वायत्त संस्थेची जबाबदारी राष्ट्रीय स्तरावरील अभियांत्रिकी महाविद्यालये, वैद्यकीय महाविद्यालये, केंद्रीय विद्यापीठे यासारख्या उच्च शिक्षणाच्या संस्थांसाठी प्रवेश परीक्षा घेणे आणि त्यांचे निकाल जाहीर करणे ही आहे. या संस्थेला संपूर्ण पारदर्शकतेने आंतरराष्ट्रीय मानकांनुसार परीक्षा घेण्याची जबाबदारी देण्यात आली होती; पण 'नीट' परीक्षेच्या निकालावर उपस्थित झालेल्या प्रश्नांमुळे ही संस्था आणि तिचे काम संशयाच्या भोवऱ्यात सापडले आहे. या वादानंतर काही मुले आणि त्यांच्या पालकांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल करून 'नीट' परीक्षा पुन्हा घेण्यात यावी आणि प्रवेशासाठी समुपदेशनावर बंदी घालण्याची मागणी केली होती. सर्वोच्च न्यायालयाने या मागण्या मान्य केल्या नसल्या, तरी टिप्पणी करताना 'एनटीए'कडून उत्तर मागितले होते. सर्वोच्च न्यायालयाने आपल्या टिप्पणीत परीक्षेच्या पावित्र्याला बाधा पोहोचल्याचे मान्य केले आहे. या संस्थेचे प्रमुख प्रदीप जोशी हे देशातील सर्वात संवेदनशील आणि सर्वोच्च परीक्षा आयोजित करणाऱ्या केंद्रीय लोकसेवा आयोगाचे अध्यक्ष राहिले आहेत. त्यांची नियुक्ती करताना 'एनटीए'मध्येही ते केंद्रीय लोकसेवा आयोगाचे पावित्र्य राखतील असा विचार झाला असावा; परंतु 'नीट' निकालानंतर निर्माण झालेल्या वादामुळे तसे होताना दिसत नाही. 'नीट' निकालावरील सर्वात मोठा प्रश्न विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या वाढीव गुणांचा आहे. तसेच, याच मालिकेतील 'नीट' टॉपर्समध्ये आठ विद्यार्थ्यांची उपस्थिती संशयाचे कारण बनली आहे. प्रथम क्रमांक मिळविलेले यातील सहा विद्यार्थी हरियाणातील बहादूरगड येथील एकाच परीक्षा केंद्रातील आहेत. एका प्रसिद्ध कोचिंग कंपनीच्या संस्थापकाने 'नीट' परीक्षेतील सर्व गैरप्रकारांबाबत औपचारिक निवेदन दिले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, 'एनटीए' ने ज्या १५७३ विद्यार्थ्यांना वाढीव गुण दिले, त्यांची योग्य तपासणी केली नाही. सहा विद्यार्थ्यांना शंभर टक्के गुण का दिले गेले? प्रत्यक्षात आठपैकी सहा टॉपर्सना वाढीव गुण देण्यात आले आहेत. परीक्षा केंद्रामुळे ज्यांचा वेळ वाया गेला, त्यांना गुण देण्याची व्यवस्था करण्यात आली होती, असे समर्थन करण्यात आले. काही परीक्षा केंद्रांवर उत्तरपत्रिका वाटण्यास विलंब होत असल्याच्या तक्रारी होत्या. ६७ टॉपर्सपैकी सहा विद्यार्थी याच बहादूरगड केंद्रावरचे आहेत. त्यांना वाढीव गुण देण्यात आले आहेत. एवढी स्वायत्त संस्था, काटेकोर नियोजन, यंत्रणा हाताशी असताना मुळात काही केंद्रावर उत्तरपत्रिका पोचण्यास विलंब का झाला आणि त्याला जबाबदार असणाऱ्यावंर काय कारवाई केली, हे पुढे यायला हवे होते. ते तसे आले नाही. 'नीट' परीक्षा पाच मे रोजी झाली होती. त्यासाठी ९ फेब्रुवारी ते ९ मार्च या कालावधीत ऑनलाइन अर्ज भरायचे होते. त्या वेळी दोन दिवस अर्ज दाखल करण्याची वेबसाइट क्रॅश झाली होती. त्यानंतर पालकांच्या मागणीनुसार 'एनटीए'ने फॉर्म भरण्याची शेवटची मुदत दोन दिवसांनी वाढवली होती. आठ टॉपर्सबाबतही सांगितले जात आहे, की त्यांनी वाढीव दोन दिवसांत फॉर्म जमा केले नाहीत का, याचीही चौकशी करावी.

'नीट'परीक्षेसाठी २० लाख ३८ हजार विद्यार्थ्यांनी अर्ज करून परीक्षा दिली होती. यापैकी ११ लाख ४५ हजार विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. उत्तीर्ण विद्यार्थ्यांच्या संख्येबाबतही वाद आहे; मात्र या आरोपांनंतर केंद्रीय शिक्षण मंत्रालयाने विद्यार्थ्यांना देण्यात आलेल्या वाढीव गुणांचा आढावा घेण्यासाठी समिती स्थापन केली आहे. 'नीट' परीक्षेत वेळ संपत असल्याच्या तक्रारी आल्या, तेव्हा वाढीव गुणांची तरतूद करण्यात आली होती. 'एनटीए'चे म्हणणे आहे, की ही प्रणाली सर्वोच्च न्यायालयाने सेट केलेल्या सामान्यीकरण सूत्रावर आधारित आहे. निकालाबाबत असमाधानी असलेले विद्यार्थी वाढीव गुण आणि गुणांमध्ये असामान्य वाढ यावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत आहेत. त्यामुळे 'नीट'परीक्षेच्या पावित्र्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे. एवढेच नाही तर 'नीट'च्या सामान्यीकरणाच्या सूत्रावरही प्रश्न उपस्थित केले जात आहेत. विद्यार्थ्यांचा असंतोष दूर करण्यासाठी सर्व शंकांचे निरसन केले पाहिजे. 'नीट'च्या निकालाबाबत गोंधळ सुरू आहे. अनेक ठिकाणी निदर्शने झाली.

पेपर फुटल्याचा आरोप विद्यार्थी करत आहेत. त्यामुळे या परीक्षेच्या निकालाबाबत पुन्हा एकदा विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड नाराजी आहे. या परीक्षेबाबत वाद होण्याची ही पहिलीच वेळ नाही. याआधीही अनेकदा वाद निर्माण झाले आहेत. वैद्यकीय प्रवेशासाठी घेण्यात येणाऱ्या परीक्षा वादाशी संबंधित आहेत. प्रवेश परीक्षेतही दोनदा पेपर फुटल्याची प्रकरणे समोर आली आहेत. परीक्षा आयोजित करताना अनेक अनियमितता झाल्या असून, त्यामुळे अनेकवेळा प्रश्न उपस्थित झाले आहेत. पेपरमधील चुकांसोबतच त्याच्या संस्थेतही अनेक चुका झाल्या आहेत. राजस्थानमधील सवाई माधोपूर येथे इंग्रजी माध्यमाच्या विद्यार्थ्यांना हिंदी माध्यमाचा पेपर देण्यात आला. त्यामुळे विद्यार्थ्यांनी चांगलाच गोंधळ घातला आणि नाराजी व्यक्त केली.

२०२२ मध्येही असाच एक प्रकार उघडकीस आला होता. देशातील अनेक केंद्रांवर विद्यार्थ्यांना चुकीचे पेपर देण्यात आले. त्या वेळी हे प्रकरण खूप चर्चेत होते. 'नीट'२०२१ मध्ये विचारलेल्या भौतिकशास्त्राच्या प्रश्नाबाबतही वाद झाला होता. त्यामुळे विद्यार्थी प्रतिनिधी सर्वोच्च न्यायालयात गेले होते. या प्रश्नात हिंदी आणि इंग्रजी अनुवादात फरक होता. प्रत्येक वेळी 'नीट' परीक्षेत काहीतरी चूक होते. त्यामुळे विद्यार्थ्यांना न्यायालयाचे दरवाजे ठोठवावे लागतात. गेल्या काही वर्षांत 'नीट'च्या परीक्षेवरून मागचा गोंधळ पुढे चालू हे नाट्य सुरू असते. ते कोठेतरी थांबले पाहिजे. आधीच जीवघेणी आणि गळाकापू स्पर्धा असताना विद्यार्थ्यांच्या जीवनाशी खेळण्याचा सरकारला अधिकार कुणी दिला, याचे उत्तर मिळाले पाहिजे.

# जेव्हा शरद पवार शेताच्या बांधावर येतात



**देऊळगाव राजे :** शरदचंद्र पवार यांनी नुकतीच कारखेल (ता.बारामती)येथील सुनिल आत्माराम वाबळे यांच्या डाळिंबाच्या बागेला भेट देण्यासाठी शेताच्या बांधावर आले तेव्हा सर्व परिसरातील शेतकऱ्यांमध्ये आनंदाचे वातावरण पहायला मिळाले.यावेळी युवा नेते युगेंद्र पवार , सदाशिव सातव , सतीश खोमणे , एस. एन. जगताप ,आत्माराम वाबळे , सरपंच वैशाली रणसिंग , शामल वाबळे , सचिन भापकर , भास्कर भापकर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पवार कुटूंब व वाबळे कुटूंबाचे अनेक वर्षाचे संबंध या भेटीने अजूनच दृढ झाले. यावेळी पवार यांनी बागेची , गोठ्याची , व इतर पिकांची पाहणी करून बारकाईने चौकशी केली. आपल्या बांधावर येवुन बागेची पाहणी केल्याने आपण केलेल्या कष्टाचे चीज झाल्याचे मत सुनिल वाबळे यांनी यावेळी व्यक्त केले. यादरम्यान जानाई योजनेचे कोरेश्वरनगर परिसरात विस्तारीकरण व्हावे याबाबतही पवार साहेबांशी चर्चा करण्यात आली.

आत्माराम वाबळे हे पवार साहेबांचे जुने निष्ठावंत शिलेदार म्हणुन सुपे परगण्यात ओळखले जातात, त्यांनी बारामती पंचायत समिती सदस्य म्हणुनही काम केले आहे. त्यांचा मुलगा सुनिल वाबळे यांना कारखेल गावात संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानात मोठी कामगिरी करुन कारखेलला जिल्हात दुसरा नंबर मिळवुन देण्यात मोठा वाटा उचलला होता. २०१७ मध्ये जिल्हा परिषद निवडणूकीची सुनिल वाबळे यांनी जोरदार तयारी केली होती, पण थोडक्यात त्यांची संधी हुकली होती. अनेक वर्ष कारखेलमध्ये तालुक्याचे कोणतेच राजकीय पद नाही. नुकत्याच पार पडलेल्या लोकसभेला एकनिष्ठेने केलेले काम व शरद पवार यांची झालेली कौटूंबिक भेट यामुळे पुढील काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत नक्कीच संधी मिळेल याची जोरदार चर्चा परीसरात चालू होती.

## कामगार - मालक अंशदान भरण्याचे आवाहन

**पिंपरी चिंचवड :** महाराष्ट्र कामगार कल्याण निधी अधिनियम १९५३ च्या कलम ६ बब मध्ये झालेल्या सुधारणेनुसार महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाकडे कामगार-मालक अंशदानाचा भरणा करण्याचे आवाहन कामगार कल्याण आयुक्त रविराज इळवे यांचेकडून करण्यात आले आहे.

सदर अधिनियमात मार्च २०२४ मध्ये झालेल्या सुधारणेनुसार जून २०२४ पासून कामगार अंशदानाचे दर रु.२५/- आणि मालक अंशदानाचे दर रु.७५/- झाले आहेत. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या ु.ीलिश्रळल.ाश्रुल.ळप या संकेतस्थळवर सदर अंशदान ऑनलाईन भरणा करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

महाराष्ट्र राज्यात कार्यरत असलेल्या व ५ किंवा त्यापेक्षा अधिक कामगार/कर्मचारी असलेल्या सर्व उद्योग, कंपन्या, कारखाने, बँका, व्यापारी संस्था, हॉटेल्स, रेस्टॉरंट, हॉस्पिटल्स, ट्रान्सपोर्ट कंपन्या, टूर्स आणि ट्रॅव्हल्स, मॉल्स, वर्कशॉप, मंडळे, महामंडळे केंद्र व राज्य शासनाचे अंगीकृत उद्योग यांना हा अधिनियम लागू आहे. आस्थपनेत कार्यरत नियमित / हंगामी / कंत्राटी कामगार अथवा कर्मचारी यांच्या वेतनातून दर सहा महिन्यांनी जून व डिसेंबरमध्ये अंशदान कपात करुन ते मंडळाकडे भरणा करणे कायद्याने बंधनकारक आहे.

मंडळाकडे जमा होणाऱ्या निधीतून कामगार व त्यांच्या कुटुंबियांसाठी विविध कल्याणकारी योजना, उपक्रम व कार्यक्रम राबविण्यात येतात.

## आता सातबाऱ्यावरही आईचे नाव

### वाशिम जिल्ह्यातील भूमिअभिलेख विभागाचा पुढाकार !

**पिंपरी चिंचवड :** वाशिम राज्य सरकारने विविध सरकारी कागदपत्रांमध्ये आईच्या नावाचा समावेश करण्याचा निर्णय घेतल्यानंतर आता सातबारा उताऱ्यावरही अर्जदाराच्या नावानंतर त्याच्या आईच्या नावाचा समावेश करण्याचा निर्णय भूमी अभिलेख विभागाने घेतला आहे. दि. १ मे २०२४ नंतर जन्मलेल्या व्यक्तीच्या नावे जमीन खरेदीनंतर सातबारा उताऱ्यावर अर्जदारासह आईच्या नावाचा समावेश होणार आहे. त्या संदर्भात आता संगणक प्रणालीत बदल करण्याची प्रक्रिया भूमिअभिलेख विभागामार्फत सुरू आहे. येत्या सहा महिन्यांत त्याची अंमलबजावणी सुरू होणार आहे. महिला व बालकल्याण मालमत्ता दस्तऐवजांत नाव नोंदविता येणार विवाहित स्त्रियांच्या




बाबतीत सध्याच्या पद्धतीनुसार, विवाहानंतरचे म्हणजेच तिचे नाव पुढे पतीचे नाव आणि आडनाव अशा स्वरूपात नाव नोंदविण्याची प्रक्रिया सुरू ठेवण्यात येणार आहे. महिलेला विवाहापूर्वीच्या नावाने मालमत्तेच्या दस्तऐवजामध्ये नाव नोंदविण्याची मुभा राहील, अशी माहीती भूमिअभिलेख विभागाकडून देण्यात आली.

विभागाने काही महिन्यांपूर्वी आईच्या नावाचा समावेश करण्याचा निर्णय घेतला, त्याच भूमिअभिलेख विभागानेही ही सुविधा राबविण्याचा निर्णय घेतला आहे. याबाबत भूमी अभिलेख विभागाने दिलेल्या माहितीनुसार, १ मेनंतर जन्माला आलेल्या व्यक्तीचे संपूर्ण रेकॉर्ड तयार व्हायला काही

वर्षांचा कालावधी जातो. मात्र, सध्या व्यक्तींच्या नावासोबत आईच्या नावाचा समावेश करण्यासाठी आईच्या नावाचा नवा रकाना तयार करण्यात येणार आहे. त्याबाबत संगणकप्रणालीत तसे बदल करण्यात येणार आहेत. त्या प्रक्रियेला येत्या तीन ते सहा महिन्यांचा कालावधी लागणार आहे. येत्या ६ महिन्यांत जुन्या

व्यक्तींच्या नावासोबत आईच्या नावाचा उल्लेख करणे शक्य होणार आहे. त्या व्यक्तीला ती महिला त्याची आई असल्याचा पुरावा द्यावा लागणार आहे. त्यानंतर त्या व्यक्तीच्या नावासोबत आईचे नाव लावले जाईल. त्या संदर्भातील पुरावे तलाठ्यामार्फत शहानिशा केल्या नंतरच नोंद होणार आहे.

१ मे नंतर जन्माला आलेल्या व्यक्तीच्या सातबाऱ्यावर आईचे नाव समाविष्ट करताना आपोआप पुरावे असतील. तसेच १ मे पूर्वी जन्माला आलेल्या व्यक्तीने आईचे नाव समाविष्ट करणे हे ऐच्छिक असेल. त्यासाठी संबंधित महिला ही त्याची आई असल्याचा पुरावा मिळत नाही, तोपर्यंत नोंद होणार नाही.

## नंबरवाडी येथील आदिवासी शाळेत पहिल्याच दिवशी १०० टक्के विद्यार्थी दाखल



**नारायणगाव -** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नंबरवाडी,वारूळवाडी (तालुका जुन्नर) या शाळेत पहिल्याच दिवशी शंभर टक्के विद्यार्थी दाखल झाल्याची माहिती मुख्याध्यापक मनोहर भोसले यांनी दिली.

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नंबरवाडी या शाळेत १०० टक्के आदिवासी विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. शैक्षणिक वर्ष २०२४ - २५ च्या आज सुरू झालेल्या पहिल्याच दिवशी इयत्ता पहिलीच्या सर्व विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे.

जुन्नर पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी अनिता शिंदे, विस्ताराधिकारी संचिता अभंग, केंद्रप्रमुख दिनेश महेर यांच्या मार्गदर्शनामध्ये आजचे नियोजन करण्यात आले. यावेळी नवागत विद्यार्थ्यांचे शाळेचे मनोहर भोसले, उपशिक्षक रियाज मोमीन,शाळा व्यवस्थापन समिती, पालक व ग्रामस्थांच्या वतीने उस्फुर्त स्वागत करण्यात आले. यावेळी सर्व विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तक व वह्यांचे वाटप करण्यात आले. विद्यार्थ्यांना गोड खाऊ मिळाल्याने विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणित झाला.

## प्रणिती शिंदे यांचा देवेंद्र फडणवीस यांच्यावर गंभीर आरोप

**सोलापूर :** लोकसभा निवडणूक हातातून निसटल्याचे लक्षात येतात शहरात दंगली घडवून आणण्याचा भारतीय जनता पक्षाचा डाव होता, असा आरोप सोलापूर लोकसभा मतदारसंघातील विजयी उमेदवार प्रणिती शिंदे यांनी केला आहे. या कटामागे देवेंद्र फडणवीस सूत्रधार असल्याचा त्यांचा दावा आहे.

मतदानापूर्वी चार-पाच दिवस ही निवडणूक आपल्या हातातून गेल्याची जाणीव भाजप कार्यकर्त्यांना झाली होती.

त्यामुळे लोकांमध्ये फूट पाडून आणि दंगली घडवून विजय ओढून आणा, असा संदेश कानोकांनी पसरविण्यात आला. मतदान केंद्रात घुसण्याचाही प्रयत्न काही कार्यकर्त्यांनी केला. मात्र, उमेदवारावर गुन्हा दाखल करण्यात चा इशारा पोलीस आयुक्तांनी दिल्यानंतर या प्रकाराला वेसण बसली, असा दावाही शिंदे यांनी केला आहे.

## शिवरे रींगरोड जमिनीची मोजणी शेतकऱ्यांच्या विरोधामुळे तुर्तास रद्द

### शेतकऱ्यांच्या हरकती जाणून घेतल्यानंतर कारवाई होणार

**भोर :** पुणे-सातारा महामार्गावरील शिवरे (ता. भोर) गावातून जाणाऱ्या रिंगरोडसाठी जमिनीची मोजनी गुरुवार (दि.१३) होऊन भूसंपादन होणार होते मात्र शिवरे ग्रामस्थांनी या रिंगरोड बाबत विविध प्रकारची आंदोलने करत वारंवार विरोध दर्शवला होता. त्यांनतर रिंगरोडसाठी बागायती क्षेत्रातून जाणाऱ्या जमिनीची मोजणी करण्याबाबत तारीख शासनाकडून ठरवल्यात आल्यानंतर गावातील शेतकऱ्यांनी व कृती समितीने मंगळवार (दि. ११ जून) तातडीची बैठक घेऊन जमीन मोजणीला विरोध दर्शविला होता.शेतकऱ्यांचा रोष पाहता एमएसआरडीच्या अधिकाऱ्यांकडून शिवरेतील जमिन मोजणीची कार्यवाही रद्द करण्यात आली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना तूर्तास दिलासा मिळाला आहे.

दरम्यान रिंगरोड साठी महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाकडून जमिनी मोजणीच्या नोटीसा शेतक- ऱ्यांना बजावण्यात आल्या होत्या.


मात्र त्या नोटीसा शेतकऱ्यांनी स्वीकारल्या नव्हत्या. यानंतर गुरुवारी भूसंपादन होणार होते. परंतु कोणत्याही परिस्थितीत मोजणी होऊन देणार नसल्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला होता त्यामुळे तूर्तास भूसंपादनासाठी जमिनीच्या मोजण्या थांबवण्यात आल्या असून शेतकऱ्यांच्या नव्याने हरकती जाणून घेणार आहोत त्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येणार असल्याचे महाराष्ट्र रस्ते व विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांकडून सांगण्यात आले आहे.

# जिल्ह्याला २८,५०० क्विंटल ज्वारी खरेदीचे उद्दिष्ट मिळाले वाढवून

**अकोला :** जिल्ह्यातील ज्वारी खरेदीचे उद्दिष्ट संपल्याने शासकीय ज्वारी खरेदी केंद्र बंद करण्यात आले होते. यामुळे शेतकऱ्यांना प्रतिक्विंटल एक हजार रुपये कमी दराने ज्वारीची विक्री करण्याची वेळ आली होती.

याची दखल घेत शासनाने अकोला जिल्ह्याला २८,५०० क्विंटल खरेदीचे उद्दिष्ट वाढवून मिळाले असून, शेतकऱ्यांना खरेदीसाठी ऑनलाइन नोंदणी २० जूनपर्यंत करता येणार आहे.

जिल्ह्यात यावर्षी ६ हजार २४३ हेक्टरवर ज्वारीची पेरणी झाली आहे. जिल्ह्याची ज्वारी उत्पादकता सरासरी हेक्टरी २०



क्विंटल एवढी आहे. यामुळे जिल्ह्यात १ लाख २४ हजार ८७० क्विंटल ज्वारीचे उत्पादन झाले आहे. परंतु, शासनाने अकोला जिल्ह्याला केवळ १५ हजार क्विंटल ज्वारी खरेदीचे उद्दिष्ट दिले होते. ते उद्दिष्ट दहा दिवसांतच पूर्ण झाले असून, शेतकऱ्यांकडे सध्या १ लाख १० हजार क्विंटलवर ज्वारी शेतकऱ्यांकडे आहे. यामुळे शासनाने ज्वारी खरेदी उद्दिष्ट वाढवून द्यावे, अशा आशयाचे पत्र नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाला पाठविण्या आले होते. या पार्श्वभूमीवर जिल्ह्याला २५,८०० क्विंटल ज्वारी खरेदीचे उद्दिष्ट वाढवून मिळाल्याची माहिती आहे.

२० जूनपर्यंत करता येणार ऑनलाईन नोंदणी जिल्ह्यात सात खरेदी केंद्रांवर शासनाच्या आधारभूत किंमतीनुसार भरडधान्य ज्वारीची नोंदणीकरीता शेतकऱ्यांना आता मुदतवाढ मिळाली आहे. आता शेतकऱ्यांना दि. २० जून पर्यंत ऑनलाईन नोंदणी करता येणार आहे. दरम्यान, यापूर्वीसुद्धा मुदतवाढ मिळाली होती, परंतू नोंदणी पाहता खरेदीकरिता पुरेशी नोंदणी झाली नसल्याचे चित्र दिसून आले.

ज्वारीचे हमीदर ३,१८० रुपयेसध्या शेतकऱ्यांना बी-बियाणे, खते, कीटकनाशके खरेदी करायची आहेत. प्रतिक्विंटल ज्वारीला ३१८० रुपये असे बऱ्यापैकी हमीदर मिळत असल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. खरेदी केंद्र सुरू नसल्याने शेतकऱ्यांना सरासरी २,१५० प्रतिक्विंटलप्रमाणे ज्वारी विक्री करण्याची वेळ आली होती.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

# ग्रामीण भागामध्ये इंग्रजी शाळेकडे पालक वर्गाचा कल

## तर मराठी शाळांना घर घर

- शुभम गुरव

ग्रामीण भागामध्ये यापूर्वी फक्त प्राथमिक मराठी शाळा होत्या परंतु दिवसेंदिवस शिक्षणामध्ये अमूल्य बदल होत गेल्याने पालक वर्गाने आपल्या पाल्याला उच्च शिक्षण मिळावे म्हणून इंग्रजी शाळेकडे जाणे पसंत केल्याने ग्रामीण भागातील मराठी शाळांना घरघर लागल्याचे वास्तव चित्र पाहात मिळत आहे याबाबत सविस्तर वृत्त असे की यापूर्वी ग्रामीण भागामधील प्राथमिक मराठी शाळा ह्या एकमेव होत्या या मराठी शाळेमध्ये इयत्ता पहिली ते सातवीपर्यंत शिक्षणाचे सोय होती. परंतु आता या कलियुगामध्ये हायस्कूल शाळांनी सर्व प्राप्त झाल्याने त्या स्कूलमध्ये इयत्ता पाचवी पासून ते दहावीपर्यंत शिक्षणाची सोय झाली त्यामुळे पालक वर्गाने ही आपल्या मुलाला हायस्कूलमध्ये प्रवेश घेण्यास सुरुवात केली. पुढे हळूहळू प्राथमिक मराठी शाळेमधील इयत्ता पाचवी ते सातवीचे वर्ग हे जवळपास बंद झाल्याने प्राथमिक मराठी शाळेमध्ये फक्त इयत्ता पहिली ते चौथीचे वर्ग शिल्लक राहिले आहेत वास्तविक गोरगरिबांना मराठी शाळा ही फार महत्वाची आहे आता पुन्हा ग्रामीण भागामध्ये इंग्लिश मीडियम स्कूल सुरू झाले असून या इंग्लिश मधून स्कूल मध्ये अगदी केजी पासून सुरुवात झाली आहे आकर्षक इमारती स्कूल बसची सुविधा अशा अनेक सुविधा ह्या खाजगी इंग्लिश मीडियम स्कूल विद्यार्थ्यांना पुरवत आहेत.

परंतु त्या ठिकाणी दर्जेदार शिक्षण मिळावे म्हणून पालक वर्ग ही आता इंग्लिश मीडियम कडे आपल्या पाल्याचा प्रवेश घेऊ लागल्याने प्राथमिक मराठी शाळेची अवस्था ही तळ्यात मळ्यात झाली आहे.वास्तविक आज प्रत्येक पालकांनी मराठी शाळा वाचवण्यासाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे.

### इंग्रजी शाळा नाव मोठे लक्षण खोटे

**शिक्षण क्षेत्रामध्ये अमूल्य बदल झाले असले तरी इंग्रजी शाळांच्या भूल बुलैयाला आजचा पालक हा भुलत आहे त्यामुळे ग्रामीण भागामध्ये ही इंग्रजी शाळा येऊन पोहोचल्या आहेत दर्जेदार शिक्षणाचा अभाव पहायला मिळत असून त्यामुळे विद्यार्थ्यांची अवस्था ही आगीतून उठून फुफूट्यात पडल्यासारखी झाल्याचे वास्तव चित्र ग्रामीण इंग्लिश मीडियम स्कूल मध्ये पहावयास मिळत आहे**

कारण श्रीमंताची मुले ही इंग्लिश मीडियमला जातील परंतु गोरगरीब यांची मुले कोठे जाणार पर्यायी त्यांना एकच मार्ग आहे तो म्हणजे प्राथमिक मराठी शाळा. प्राथमिक मराठी शाळेमध्ये अगदी कॅम्पुटर पासून ते पोषण आहारापर्यंत सर्व सुविधा या मराठी शाळेमध्ये दिलेला आहे तरीदेखील पालक वर्ग हा खोट्या देखाव्याला भुलत असून केवळ इंग्रजी शाळेत प्रवेश घेतला म्हणजे आपल्या मुलाला दर्जेदार शिक्षण मिळेल ही त्यांची अपेक्षा आहे परंतु या इंग्लिश मीडियम स्कूल मध्ये शिक्षकांचा दर्जा पाहिल्यास कमी पगारावर कमी शिक्षक काम करीत आहेत मुळातच काही शिक्षकांना इंग्लिश मीडियम मध्ये धड इंग्रजीचे नॉलेजही नाही अशी परिस्थिती आहे ग्रामीण भागातील पालक वर्गाला या इंग्रजी शाळेबाबत कसली कल्पना नसते केवळ देखावा बघून इंग्लिश मीडियम मध्ये प्रवेश घेणे एवढेच त्या पालकाला समजते आता खऱ्या अर्थाने प्रत्येक पालकांनी आपली मराठी शाळा वाचवण्यासाठी प्रयत्न करून शिक्षकांनाही सहकार्य करावे अशी अपेक्षा सर्वसामान्य पालक वर्ग करीत आहे

# अण्णा हजारेंचा युटर्न ?



शिखर बँक घोटाळा प्रकरणातील क्लोजर रिपोर्टला ज्येष्ठ समाजसेवकअण्णा हजारेयांनी आव्हान दिल्याची बातमी समोर आली होती. यामुळे राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू झाल्या होत्या. उपमुख्यमंत्रीअजित पवारयांच्या अडचणी पुन्हा वाढणार अशा चर्चा सुरू होत्या. अजितदादांच्याराष्ट्रवादी काँग्रेसमधीलनेत्यांनीअण्णा हजारेयांच्यावर जोरदार टीका केल्या होत्या.दरम्यान, आता या प्रकरणावर स्वत: ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी प्रतिक्रिया दिली आहे. 'त्या क्लिन चीट विरोधात माझा कोणताही अर्ज नाही', असं स्पष्टीकरण अण्णा हजारे यांनी दिले आहे.- ऊाएठढखडएचएछद्धझुशीशव लू'मविआ'मध्ये छोटा, मोठा भाऊ कुणीही नाही, लवकरच जागावाटप करणार'; पृथ्वीराज चव्हाणांनी चर्चांना दिला पूर्णविरामआज टीव्ही नाईन या वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीमध्ये ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे क्लिन चीट विरोधातील आव्हानावर बोलताना म्हणाले, मला याबाबत काही माहिती नाही, मी वर्तमानपत्रात पाहिलं तर माझ नाव होतं. मी काहीही बोललं नाही, तरीही माझ नाव बघून मला धक्का बसला. माझ्या नावाचा दुरुपयोग करुन काही लोक स्वार्थ साधतात. अशा बातम्यांवर विश्वास ठेवू नका, असंही अण्णा हजारे म्हणाले. पंधरा वर्षापूर्वी या प्रकरणावर आवाज उठवला होता. आता यावर येत आहे. क्लिन चीटवर बोलताना हजारे म्हणाले, लोकांना माहित असेल तर बोलतील.

# प्रभात फेरी, औक्षण करून गुलाबपुष्प देऊन नवागतांचे स्वागत



**नारायणगाव :** १५ जून २०२४ रोजी नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात झाली. 'ही आवडते मज मनापासून शाळा लाविते लळा ही जशी माऊली बाळा. या उक्तीप्रमाणे आज पहिल्याच दिवशी चिमुकल्यांचा चिवचिवाट ऐकायला आला. नवागतांचे स्वागत आनंदाने भरला मेळा,चला चला सुरू झाली शाळा असे म्हणत आपल्या आईचा हात धरून बस्ती, सावरगाव (तालुका जुन्नर) येथे मुले शाळेत दाखल झाली.

ग्रामस्थ पालक आणि शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष सर्व सदस्य त्याचप्रमाणे आदर्श गाव श्रीक्षेत्र बस्ती चे प्रथम नागरिक सरपंच प्रकाश गिदे, माजी उपसरपंच रोहिदास गोरडे, शिक्षणा फाउंडेशनचे बाळू काटे सर , सूरज जाधव, गणेश गोरडे आदी मान्यवर यावेळी आयोजित केलेल्या मेळाव्यास उपस्थित होते.

प्रथम विद्यार्थ्यांची प्रभात फेरी काढून, औक्षण करून गुलाबपुष्प देण्यात आले. मोफत पाठयपुस्तके, पेन्सिल पाऊच, वह्यांचे व पौष्टिक खाऊचे वाटप करण्यात आले.

दरम्यान आज वृक्षारोपणही करण्यात आले .त्याचबरोबर पर्यावरणाचा संदेश देण्यात आला- झाडे लावा झाडे जगवा. पर्यावरणाचे रक्षण, वसुंधरेचे रक्षण. शाळेतील एक वेगळा उपक्रम म्हणून यावर्षी प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या घरी किंवा शेतामध्ये प्रत्येकी दोन झाडे लावण्याचा सर्वांनी संकल्प केला.

जुन्नर पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी अनिता शिंदे, सावरगाव बीटचे विस्तार अधिकारी विष्णू धोंडगे, गुंजाळवाडी केंद्रप्रमुख अरुणा बोऱ्हाडे यांनी शाळा प्रवेशोत्सव आणि शाळा पूर्वतयारी मेळाव्यास उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या व मार्गदर्शनही केले.

गावचे प्रथम नागरिक सरपंच प्रकाश गिदे यांनी मनोगत व्यक्त केले.यावेळी सरपंच प्रकाश गिदे म्हणाले , विद्यार्थी हे देशाचे सुजाण नागरिक आहेत आणि ते घडवण्याचे पवित्र काम शिक्षकवृंद करीत आहे. ज्ञानदानाच्या पवित्र कार्याला शाळेच्या सर्वतोपरि सहकार्य करण्याची संपूर्ण ग्रामस्थांच्या वतीने आश्वासन देण्यात आले. याप्रसंगी भारत टॅलेंट सर्च परीक्षा २०२४ राज्य गुणवत्ता यादीमध्ये १० वा क्रमांक आलेली जिज्ञासा महेश बोर्डे हिचा सत्कार करण्यात आला.

तसेच इयत्ता पहिली मध्ये दाखल होणारे विद्यार्थी, पालक प्रवेशोत्सव आणि शाळा पूर्व तयारी मेळावा कार्यक्रमाचे नियोजन शालेय व्यवस्थापन समितीच्या सदस्या सोनल हिंगे, सुनीता गोरडे, छाया गोरडे, तेजल पाचपुते यांनी केले.

# दोनशे कोटींच्या उजनी पर्यटन विकास आराखड्याला मंजुरी

## जिल्हाधिकारी, अजित पवार यांच्या समोर सादरीकरण



**सोलापूर :** उजनी धरण परिसर पर्यटन दृष्टीने विकसित करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने १५० ते २०० कोटीचा जिल्ह्याचा एकात्मिक पर्यटन आराखडा तयार केला असून शनिवारी उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री अजित पवार यांच्यासमोर सादर केला. या आराखड्यात तत्वत: मंजुरी देण्यात आली असून यासाठी आवश्यक निधीची देखील तरतूद करण्यात येईल, अशी माहिती अजित पवार यांनी बैठकीत दिली.उजनी धरण परिसरात पाटबंधारे विभागाच्या जागेवर मोठे पाविलियन निर्माण करण्यात येणार आहे. यात तिकीट केंद्र व प्रतीक्षलय उभारण्यात येणार आहे.

मनोरंजन केंद्र, हॉटेल्स, १ हजार क्षमतेचे मोठे सभागृह, बोर्ड रूम, रॉक पूल तसेच भारतातील सर्वात मोठा जलतरण तलाव, वॉटर फ्रंट डेक, लाईट हाऊस, बोट रॅम्प, मरिना बोट पार्किंग, वॉटर स्पोर्ट्स, फ्लाईंग वॉटर बोर्ड, बोट सफारी, क्रुझ सफारी, अक्वेटिक लाईफ यासह अन्य सुविधा पर्यटकांसाठी उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. उजनीच्या सर्वेक्षणास २० जून पासून सुरुवात होणार आहे. कृषी व विनयार्ड आराखडा ३० जुलै रोजी तयार होईल.

प्रकल्प अहवाल व अंतिम सादरीकरण १५ ऑगस्ट रोजी होणार आहे. त्यानंतर एक ते दीड महिन्यात प्रकल्पाला राज्य शिखर समितीची मान्यता मिळेल. त्यानंतर लवकरच या प्रकल्पाचे काम सुरू होईल, अशी माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी दिली.

# शंभर कोटी रस्त्यांची कामे अपूर्ण

## दर्जा तपासण्यासाठी मंगळवारी अधिकाऱ्यांसोबत पंचनामा करणार



**कोल्हापूर :** महाराष्ट्र राज्य सुवर्ण जयंती महाअभियानातंर्गत कोल्हापूरातील १६ रस्त्यांसाठी तब्बल शंभर कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला आहे, मात्र पाच रस्ते पूर्ण झाल्याचा दावा करणाऱ्या महापालिकेकडून ही कामे अपूर्ण असल्याचा आरोप आम आदमी पार्टीने शनिवारी पत्रकार परिषदेचे प्रदेश संघटन सचिव संदीप देसाई यांनी केला. दरम्यान, रस्ते कामाचा दर्जा तपासण्यासाठी ४६ वेगवेगळ्या चाचण्यांचीही नोंद महापालिकेकडे नसल्याचा आरोप करुन दर्जा तपासण्यासाठी मंगळवारी गोखले कॉलेज येथे अधिकाऱ्यांसोबत पंचनामा करणार असल्याचे त्यांनी जाहीर केले.

कोल्हापुरातील १६ रस्त्यांच्या कामाची वर्कऑर्डर गेल्यावर्षी डिसेंबर महिन्यात एवरेस्ट कंपनीला दिली. चार महिने उशिराने गाजावाजा करत पालकमंत्र्यांच्या हस्ते या कामाचा आरंभ केला. महापालिकेने यातील पाच रस्ते पूर्ण झाल्याचा दावा केला आहे.

स्वत: पालकमंत्री हसन मुश्रीफ यांनीही याचा पुनरुच्चार जिल्हाधिकारी कार्यालयात केला. परंतु यातील एकही रस्ता अंदाजपत्रकाप्रमाणे पूर्ण झाला नसल्याचा आरोप आपने केला आहे. कोल्हापूरातील रस्ते अंदाजपत्रक आणि रोडक्रॉस सेक्शन डिझाईनप्रमाणे केलेले नाही. राजारामपुरी माउली चौक ते गोखले कॉलेज या रस्त्यावर बीटूमिनस कॉंक्रेट ३० मिमीच्या लेअर टाकलेला नाही. वेट मिक्स मॅकेडम, डाव्या बाजूस आरसीसी पडदी चॅनेल, उजव्या बाजूस सिमेंट क्रॉंक्रेट पाईप टाकण्यासाठी तब्बल तीन कोटी रुपयांचे काम प्रत्यक्षात झालेच नसल्याचा आरोपही देसाई यांनी केला. रस्ते कामाचा दर्जा राखण्यासाठी व्हिजिलन्स न्ड क्वालिटी सर्कल कंट्रोलच्या मानक नियमावलीचा अवलंब करुन त्रयस्थ तांत्रिक परीक्षण करायचे आहे. या चाचण्यांसाठी ६८ लाख रुपये देण्यात येणार आहेत. एका रस्त्यासाठी ४६ वेगवेगळ्या चाचण्या कराव्या लागतात. परंतु पावसाळा सुरु झाला तरी यासंदर्भातील कोणताच अहवाल महापालिकेने जाहीर केलेला नाही असाही आरोप देसाई यांनी केला.

या रस्त्याचे काम दिलेल्या कंपनीने उपठेकेदार नेमल्याचाही आरोप त्यांनी केला आहे. या परिषदेला शहराध्यक्ष उत्तम पाटील, अभिजित कांबळे, मयूर भोसले, विजय हेगडे, मोईन मोकाशी, प्रथमेश सूर्यवंशी, अमरसिंह दळवी उपस्थित होते.

# संचमान्यतेचा जुलमी शासन निर्णय रद्द करा अन्यथा तीव्र आंदोलन छेडणार

## : शिक्षक समितीचे राज्य नेते उदय शिंदे



**आसनगाव :** प्राथमिक शिक्षकांच्या कडून गुणवत्तेची अपेक्षा करणारे प्रशासन गुणवत्तेसाठी आवश्यक असणारी पदभरती प्रमोशन याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे. शासनाच्या जुलमी संचमान्यतेमुळे वाडी वस्तीवरील शाळांचे भवितव्य धोक्यात येणार आहे.तेव्हा संचमान्यतेचा जुलमी शासन निर्णय रद्द करून शिक्षकांच्या विविध प्रलंबित मागण्या मान्य करा यासाठी शिक्षक समितीने एकदिवसीय आंदोलन पुकारले आहे.शिक्षकांच्या या मागण्यासाठी भविष्यातही शिक्षक समिती तीव्र आंदोलन उभारणार आहे. असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीचे राज्य नेते उदय शिंदे यांनी केले.

महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक.समितीचे राज्य नेते उदय शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सातारा येथे जिल्हाधिकारी कार्यालयासमोर चालू शैक्षणिक वर्षाच्या पहिल्याच दिवशी एक दिवसीय धरणे आंदोलन आयोजित करण्यात आले होते.यावेळी शिक्षकांना मार्गदर्शनपर उदय शिंदे बोलत होते.यावेळी प्रामुख्याने शिक्षक समितीचे जिल्हाध्यक्ष विश्वंभर रणनवरे, शिक्षक बँकेचे चेअरमन किरण यादव,माजी अध्यक्ष शंकर देवरे ,शिक्षक बँकेचे माजी चेअरमन नवनाथ जाधव जिल्हा सचिव संतोष मांढरे,माजी जिल्हा सरचिटणीस सतीश नलवडे,कोषाध्यक्ष मोहनराव सातपुते, आदीसह सर्व तालुक्यांचे अध्यक्ष, सरचिटणीस,शिक्षक बँकेचे संचालक शिक्षक कार्यकर्ते बहुसंख्येने उपस्थित होते.

यावेळी जिल्हाध्यक्ष रणनवरे म्हणाले, शिक्षक समिती ही लढवययी संघटना आहे. शिक्षकांसाठी सातत्याने काम करणारी संघर्षमय इतिहास असणारी संघटना म्हणजे शिक्षक समिती होय.आमच्या मागण्या मान्य झाल्याशिवाय आम्ही शांत रहाणार नाही.हे एक दिवशीय आंदोलन होते.भविष्यात हे आंदोलन अजून तीव्र स्वरूपात केले जाणार असल्याचे सांगितले.

सदर आंदोलनातील प्रमुख मागण्या १५ मार्च २०२४ चा जुलमी संचमाण्यतेचा शासन निर्णय रद्द करावा तसेच विद्यार्थी व शिक्षक गणवेश धोरणाचा फेरविचार व्हावा. अशैक्षणिक कामे व ऑनलाईन ऑफलाईन खर्डेघाशीची कामे बंद करावीत १ नोव्हेंबर २००५ पूर्वी पद जाहीरात निघालेल्या व त्यानंतर सेवेत आलेल्या शिक्षक व अन्य जिल्हा कर्मचाऱ्यांना मूळची जुनी पेन्शन योजना लागू करण्यासाठी विकल्प भरुन घेण्यात यावेत. समूह शाळा धोरण / दत्तक शाळा योजना / खाजगीकरणाचे धोरण थांबविण्यात यावे. जिल्हा परिषद स्तरावरील प्रलंबित प्रश्नांची सोडवणूक व्हावी.

नव्या संचमान्यता शासन निर्णयानुसार शिक्षकांची अनेक पदे अतिरिक्त होणार आहेत. त्यामुळे अतिरिक्त झालेल्या कर्मचाऱ्यांना सक्तीने व्हीआरएस घेण्याचा दबाव शासनाने इडछड मध्ये आणला, तसाच प्रकार आपल्याकडेही घडू शकतो त्यावेळी कुठले नियम, कुठले निकष लावले जातील आणि कुणाला सेवेतून सक्तीने सेवानिवृत्त केलं जाईल हे आज सांगता येणार नाही. त्यामुळे सेवाज्येष्ठ आणि सेवाकनिष्ठ दोघांनाही आपली नोकरी वाचवण्यासाठी या आंदोलनात सहभागी व्हावे लागले आहे.

२० पटा खालच्या शाळांना शासन एकच शिक्षक आणि त्यांच्या जोडीला सेवानिवृत्त शिक्षक देणार आहे.

शिवाय १० पटाखालच्या शाळांना एकच शिक्षक देण्याचं प्रस्तावित आहे. अशाने त्या शाळांची गुणवत्ता ढासळेल आणि हळूहळू त्या बंद पडतील. त्यामुळे पुन्हा अतिरीक्त शिक्षकांचा प्रश्न उभा राहील.

बहुजनांचे शिक्षण वाचवण्यासाठी सगळे शिक्षक हे बहुजन समाजाची मुलं आहेत. आपल्या सर्वांच्या घराजवळ शाळा होत्या.

मोफत शिक्षण होतं म्हणून आपण शिकलो. आता त्याच शाळा बंद पाडण्याचं षडयंत्र चालू आहे.तेव्हा मराठी शाळा वाचवायच्या असतील तर आपल्याला आंदोलनात उतरायला हवं.

खरंतर गणवेश हा विद्यार्थ्यांसाठी बंधनकारक असतो. कारण गरीब-श्रीमंत, उच्च-नीच हे भेदभाव गळून पडावेत आणि सर्व मुले समान स्तरावर यावीत हा त्यामागचा उद्देश असतो. मात्र शिक्षकांसाठी गणवेशाचा हा नियम अनाठायी असून या माध्यमातून शासन आपल्यावर हुकूमशाही लादत आहे. शिवाय शासनाच्या ज्या कर्मचाऱ्यांना गणवेशाची सक्ती आहे, त्यांच्यासाठी धुलाई भत्ता इ. सुविधा असतात. त्या शासन आमाला देत नाही. मग हा निर्णय कोणासाठी आणि कशासाठी याला विरोध करन्यासाठी हे आंदोलन होत आहे.

शिक्षक समितीच्या सातत्यपूर्ण मागणीला वेंगुर्ला अधिवेशनात यश आल्याने सर्व विद्यार्थ्यांना गणवेश मिळण्याचा मार्ग मोकळा झाला. शाळेचा पहिला दिवस नविन गणवेशामुळे विद्यार्थ्यांसाठी हर्षोल्हास घेऊन येतो आनंददायी होतो. शासनाच्या धरसोड धोरणामुळे यंदा घोर निराशा वाट्याला आली आहे.

शालेय गणवेशाचा अजूनही पत्ता नाही तर स्काऊट गाईडचा दोन - तीन खिसे असलेला गणवेश १००/११० रुपयांत शिवून घेण्याची जबाबदारी मुख्याध्यापकांवर टाकण्यात आली आहे.एवढया कमी दराने शिलाई कशी होणार हे धोरण कर्त्यांनाच ठाऊक

गणवेशासाठी असलेले मूळचे धोरण पूर्ववत कायम ठेवण्यासाठी शासनाला भाग पाडण्यासाठी जुन्या पेन्शनसाठी विकल्प भरुन घ्यावेत १ नोव्हेंबर २००५ पूर्वी पद जाहीरात निघालेल्या व त्यानंतर सेवेत आलेल्या जिल्हा परिषद कर्मचारी व शिक्षक बांधवांना मूळची जुनी पेन्शन योजना लागू करावी यासाठी विकल्प भरुन घेण्यासाठी जिल्हा परिषद स्तरावरील प्रलंबित असलेल्या प्रश्नांची सोडवणूक व्हावी यासाठी जिल्हा परिषद प्रशासनाकडे आग्रहाने मागण्या मांडण्यासाठी हे आंदोलन करण्यात आले. यावेळी प्रामुख्याने शंकर देवरे , जिल्हा कोषाध्यक्ष मोहनराव सातपुते,खटाव उमेश पाटील,कराड पाटण शिक्षक सोसायटीचे माजी चेअरमन अंकुश नांगरे, विनायक चव्हाण आदीसह बहुसंख्य कार्यकर्त्यांनी मनोगत व्यक्त केले.

# महावितरणच्या प्रीपेड मीटरने ग्राहकांची लूट


## काँग्रेसच्या माजी मंत्र्यांचा आरोप

**अमरावती :** महाराष्ट्रात सध्या महावितरणच्या वतीने घरोघरी जाऊन प्रीपेड मीटर लावण्याचे काम जोरात सुरू आहे. मात्र, हे मीटर म्हणजे मोबाईल रिचार्ज प्रमाणे ग्राहकांची लूट करणारे आहे. वीज प्रीपेड मीटरमध्ये भविष्यात २८ दिवसांचा प्लॅन असेल. त्या माध्यमातून वर्षाला १२ ऐवजी १३ महिने कंत्राटदार वीज ग्राहकांकडून वसुली करतील, असा खळबळ जनक दावा काँग्रेसचे माजी मंत्री डॉ. सुनील देशमुख यांनी केला आहे.

संपूर्ण महाराष्ट्रात सध्या महावितरणच्या वतीने प्रीपेड वीज मीटर लावण्याचा धडाका सुरू झालेला आहे. या मीटरचे अनेक फायदे सांगितले जात आहेत. तरी पहिल्याच टप्प्यात मीटर रिडींग घेणारे हजारो हात बेरोजगार होणार असल्याने राज्यभरात आंदोलन सुरू झाले आहे. वीज ग्राहकांना हे मीटर सक्तीचे करू नये यासाठी अनेकांनी न्यायालयाचा दरवाजा सुद्धा ठोठावला आहे.

रिवेम्प्ड डिस्ट्रीब्यूशन सेक्टर स्कीम (आरडीएसएस) अंतर्गत हे प्रीपेड वीज लावण्याची प्रक्रिया सुरू आहे. मात्र, या प्रीपेड मीटर चे अनेक धोके असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. याबाबत काँग्रेसचे नेते व माजी मंत्री डॉ. सुनील देशमुख महाराष्ट्र टाईम सोबत बोलताना म्हणाले की, प्रीपेड वीज मीटर म्हणजे ग्राहकांची शुद्ध लूट आहे. खाजगी कंपन्यांसोबत हात मिळवणी करून सरकारमधले लोक चंदा दो धंदा लो या तत्त्वावर काम करत आहे. ज्याप्रमाणे मोबाईल कंपन्या २८ दिवसांचा रिचार्ज देतात. त्याचप्रमाणे हे प्रीपेड मीटर सुद्धा भविष्यात काम करणार आहे. वीज मीटर आणि मोबाईल बिलच्या माध्यमातून सरकारने सर्वसामान्यांच्या आयुष्यात दुष्काळात १३ महिने दाखल केला आहे म्हणजे वर्षाला ३६५ दिवस.

मात्र, आता २८ दिवसांच्या हिशोबाने १२ महिन्याचे ३३६ दिवस होतील. दरवर्षी २९ दिवसांचे अतिरिक्त पैसे या कंत्राटदार कंपन्या वसूल करतील. एका अर्थाने १२ महिन्याच्या दैनंदिन कॅलेंडरमध्ये सरकार आता आर्थिक दृष्ट्या दुष्काळात १३ महिना झाला असून त्या माध्यमातून या खासगी कंपन्या जोरदार वसुली करण्याचा धोका असल्याचा आरोप माजी मंत्री डॉ. सुनील देशमुख यांनी केला आहे. अमरावती जिल्ह्यात तसेच संपूर्ण महाराष्ट्रात विविध ठिकाणी प्रीपेड वीज मीटर लावण्या संदर्भात निवेदन व आंदोलन असे सत्र सुरू आहे. अशातच माजी मंत्र्यांनी मांडलेला १३ महिन्यांचा हिशोब अनेकांना थक्क करणारा असून, भविष्यात ग्राहकांच्या खिशाला कात्री लावणारा सुद्धा आहे.



## केंद्र सरकारने काढले नाफेडचे कांदा दरनिश्चितीचे अधिकार

**नाशिक :** उन्हाळ कांद्याचे दर कोसळल्यानंतर शेतकऱ्यांची नाराजी दूर करण्यासाठी केंद्राने नाफेड व एनसीसीएफ या दोन संस्थांमार्फत कांदा खरेदी करण्याचा निर्णय घेतला खरा, मात्र कांद्याच्या दर निश्चितीचे नाफेडला असलेले अधिकारच सरकारने काढला.

गेल्या काही दिवसांपासून नाफेडकडे बाजारपेठेपेक्षा भाव कमी असल्याने या खरेदी केंद्रांकडे शेतकऱ्यांनी पाठ फिरवली आहे. बाजारभावापेक्षा किमान पाचशे रुपये अधिक मिळतील, अशा दराने नाफेडमार्फत पूर्वी कांदा खरेदी केली जात होती.

परंतु, आता वाणिज्य मंत्रालयामार्फत प्रत्येक आठवड्याला एक दर निश्चित केला जाणार आहे. त्याप्रमाणेच आता नाफेड व एनसीसीएफला खरेदी करणे बंधनकारक राहणार आहे.

## कपिल पाटलांचा भिवंडीत दंगली घडविण्याचा कट, बाळ्यामामांचा आरोप

**भिवंडी :** तालुक्यातील पडघा टोलनाका परिसरात सकळ हिंदू समाजाच्या वतीने भव्य सभेचे आयोजन शनिवारी करण्यात आले असून या सभेत तेलंगाना येथील आमदार टी राजा सिंह यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. परंतु नवनियुक्त खासदार सुरेश म्हात्रे उर्फ बाळ्या मामा यांनी या कार्यक्रमास विरोध केला असून या कार्यक्रमासाठी येणारे टी राजा सिंग यांना म्हात्रे यांनी तीव्र विरोध केला आहे. टी राजा यांच्या वक्तव्यामुळे भिवंडी शहरातील वातावरण खराब होण्याची शक्यता आहे. त्यामुळे या कार्यक्रमास त्यांना परवानगी देऊ नये अशी मागणी बाळ्या मामांनी शुक्रवारी पोलीस यंत्रणेकडे केली आहे.

या कार्यक्रमाच्या आयोजनावरून खासदार बाळ्या मामा यांनी माजी केंद्रीय मंत्री कपिल पाटील यांच्यावर गंभीर आरोप केले आहेत. हा कार्यक्रम कपिल पाटील यांच्या छुप्या अजेंड्याने आयोजित केला असून पाटील स्वतः या कार्यक्रमासाठी पुढाकार घेत आहेत. या कार्यक्रमाला आमचा विरोध नाही परंतु मुस्लिम बांधवांच्या बकरी ईद सणाच्या पार्श्वभूमीवरच या कार्यक्रमाचे आयोजन का करण्यात आले? असा सवाल बाळ्या मामा यांनी उपस्थित करत शहरात जातीय तेढ व भिवंडीत दंगली घडवण्याचा कट कपिल पाटील करित असल्याचा आरोप खासदार बाळ्या मामा यांनी केला आहे. तेलंगणा येथील आमदार टी राजा सिंह यांच्यावर १०५ हून अधिक गुन्हे दाखल आहेत तर १८ ते २० गुन्हे जातीय तेढ निर्माण करणारे आहे. भिवंडी मुस्लीम बहुल शहर आहे आणि अशा ठिकाणी जर जातीय तेढ निर्माण करणारे वक्तव्य होत असेल तर वातावरण खराब होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सकल हिंदू समाजाच्या सभेला विरोध नसून या सभेमध्ये वक्तव्य करणारे टी राजा सिंह यांना विरोध असल्याचे बाळ्या मामा यांनी सांगितले आहे. सोशल मीडियावर अनेक स्टेटस देखील फिरवले जात आहे. ज्यामुळे जातीय तेढ निर्माण होऊ शकते. सोशल मीडियावर जातीय तेढ निर्माण करणाऱ्यांवर देखील कारवाई करण्यात यावी, अशी मागणी आपण पोलीस प्रशासनाकडे केली असल्याचेही बाळ्या मामा यांनी सांगितले.

# महायुतीत मिठाचा खडा

## शहाजी बापू पाटलांच्या सांगोल्यात अजितदादा गटाच्या हालचाली सुरू

**सोलापूर :** सोलापूर शहर आणि जिल्ह्यात एकूण अकरा विधानसभा मतदारसंघ आहेत. सोलापुरात भारतीय जनता पार्टी आणि अजित पवारांची राष्ट्रवादी बळकट आहे. दोन्ही पक्ष महायुतीत असल्याने दोन्ही राजकीय पक्षात जागावाटप होताना रस्सीखेच होणार आहे. सोलापुरात एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेचा एकमेव आमदार म्हणजे शहाजी बापू पाटील आहेत. सांगोला विधानसभा मतदारसंघातुन अवघ्या ६७४ मतांनी शहाजी बापू पाटील विजयी झाले होते. काय झाडी, काय डोंगार या डायलॉगमुळे शहाजी बापू पाटील राज्यात प्रसिद्ध झाले होते.

२०१९ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी पक्षाकडून पाठिंबा मिळाल्याने शहाजी बापू पाटील विजयी झाले, असे राष्ट्रवादीचे स्थानिक नेते अनेकदा सांगतात. अजित पवारांच्या राष्ट्रवादी पक्षाचे शहर कार्याध्यक्ष जुबेर बागवान यांनी सांगोल्याच्या जागेवर राष्ट्रवादी (अजित पवार गट) दावा सांगेल, असे माध्यमांसमोर बोलताना माहिती दिली. सांगोला विधानसभा मतदार संघात राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या दाव्याने महायुतीत मिठाचा खडा पडू शकतो.

अजित पवारांची राष्ट्रवादी सोलापूर जिल्ह्यात बळकट आहे. मोहोळ विधानसभा मतदार संघात यशवंत माने, माढा विधानसभा मतदारसंघात बबनदादा शिंदे, करमाळा विधानसभा मतदारसंघात संजय मामा शिंदें अपक्ष आमदार आहेत. मात्र, अजित पवारांसोबत किंवा महायुतीत आहेत. या तीन विधानसभा मतदार संघात राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आमदार असल्यामुळे सिटिंग आमदार किंवा उमेदवाराला महायुतीकडून उमेदवारी मिळेल. सोलापूर शहर मध्य आणि सांगोला विधानसभा मतदारसंघात अजित पवारांच्या राष्ट्रवादीने मोर्चेबांधणी सुरू केली आहे. कार्याध्यक्ष जुबेर बागवान यांनी अजित पवारांसोबत चर्चा केली असून प्रणिती शिंदेंच्या विधानसभा मतदारसंघात तयारीला लागा असे आदेश राष्ट्रीय अध्यक्षकांकडून मिळाले असल्याची माहिती जुबेर बागवान यांनी दिली आहे. सांगोला विधानसभा मतदारसंघात शिवसेना शिंदे गटाचे शहाजी बापू पाटील विद्यमान आमदार आहेत. २०१९ मद्धे झालेल्या निवडणुकीत फक्त ६७४ मतांच्या फरकाने शहाजी बापू पाटील यांचा विजय झाला होता. शहाजी बापू पाटील यांना राष्ट्रवादीने ऐनवेळी पाठिंबा दिल्याने शिवसेनेला ही सीट प्राप्त झाली होती. राष्ट्रवादीच्या पाठिंब्याने शेकापचे डॉ. अनिकेत देशमुख यांचा पराभव झाला होता. अजित पवारांची राष्ट्रवादी सांगोला विधानसभेची जागा महायुतीत मागू शकते, यावरून रस्सीखेच होणार आहे.

# मुंबईत पाऊस सरींची लपाछपी

## सकाळी मेघगर्जना, दिवसभर ढगाळ वातावरण

**मुंबई :** शहरात मान्सून दाखल झाल्यानंतर दोन दिवस पाऊस पडला आणि त्यानंतर पुन्हा दोन दिवस पावसाची प्रतीक्षा करायला लागली. त्यानंतर शुक्रवारची सकाळ मात्र गडगडाटासह पावसाने उजाडली. काही ठिकाणी पाऊससरींनी जोरदार हजेरी लावली, तर काही भागात हलका वर्षाव झाला. त्यानंतर दिवसभर अधूनमधून ढगाळ वातावरण होते. शनिवारीही मुंबईत मेघगर्जनेसह पावसाची शक्यता आहे.



महाराष्ट्रात या आठवड्याच्या अखेरीपर्यंत फारसा पाऊस नाही, असा अंदाज वर्तवला जात असताना शुक्रवारी सकाळच्या मेघगर्जनेनंतर तुरळक ठिकाणी पावसाने उपस्थिती लावली. त्यानंतर दिवसभरात ढगाळलेले वातावरण होते, मात्र पाऊस नव्हता. सध्या पश्चिमेकडून येणारे वारे कमजोर आहेत. त्यातच चक्रवात विरोधी स्थितीमधून बाहेर येणारे वारे हे पूर्वेकडून येत होते. पश्चिमेकडून आणि पूर्वेकडून येणाऱ्या वाऱ्यांच्या संघर्षातून मुंबईमध्ये मेघगर्जनेची स्थिती निर्माण झाली, अशी माहिती प्रादेशिक हवामान विभागाच्या अधिकारी सुषमा नायर यांनी दिली. प्रादेशिक हवामान विभागाने जारी केलेल्या अद्ययावत पूर्वानुमानानुसार, मुंबईत शनिवारीही मेघगर्जनेसह पावसाची शक्यता आहे. मुंबईसह पालघर, ठाणे, रायगड, रत्नागिरी, धुळे, नंदुरबार, नाशिक, अहिल्यादेवी नगर, पुणे, सातारा, सोलापूर, परभणी, बीड, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशीव या जिल्ह्यांमध्ये रविवारी मेघगर्जनेसह पाऊस पडू शकतो. उत्तर कोकणात रविवारपासून मंगळवारपर्यंत पुन्हा एकदा हलक्या ते मध्यम सरींची शक्यता वर्तवण्यात आली आहे. रायगड, रत्नागिरी येथे रविवारी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात रविवारपासून पुढे मेघगर्जनेसह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात सोमवार आणि मंगळवारी तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे. मध्य महाराष्ट्रात नाशिक, पुणे, कोल्हापूर, सातारा, सांगली, सोलापूर तर मराठवाड्यात जालना, परभणी, बीड, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशीव येथे रविवार आणि सोमवारी मेघगर्जनेसह पावसाची शक्यता आहे. विदर्भामध्ये गडचिरोली आणि यवतमाळ येथे शनिवारी आणि रविवारी मेघगर्जनेहस पावसाची शक्यता असून, उरलेल्या जिल्ह्यांमध्ये सोमवारी आणि मंगळवारी मेघगर्जनेसह पावसाचा अंदाज आहे. सध्या नैऋत्य मौसमी वारे महाराष्ट्रात जळगाव, चंद्रपूर, अमरावती येथपर्यंत पोहोचले असून १० जूननंतर मान्सूनची प्रगती झालेली नाही. बंगालच्या उपसागरातील मान्सून शाखा ३१ मेनंतर पुढे सरकलेली नाही. मात्र येत्या चार ते पाच दिवसांमध्ये मान्सूनचा प्रवास पुन्हा सुरू होऊ शकतो, असा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तवलेला आहे.



## साताऱ्यात शाळेच्या पहिल्याच दिवशी गुरुजींचे आंदोलनाचा श्री गणेशा

**सातारा :** शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे. जो ते पिईल . तो गुरगुरल्याशिवाय राहणार नाही. असे महामानव घटनाकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितले होते.

आज शिक्षक समितीच्या वतीने सातारा जिल्ह्यात गुरुजनांना आपल्या मागण्यासाठी शाळेच्या पहिल्याच दिवशी आंदोलनाचा श्री गणेशा करून शासनाला निवेदन दिले .

## आयुष्य संपवलेल्या तरुणाच्या कुटुंबाची धनजंय मुंडेंनी घेतली भेट

**बीड :** लोकसभा निवडणुकीच्या निकालात भाजप नेत्या पंकजाताई मुंडे यांचा पराभव झाला. या पराभवाच्या दुःखात आष्टी तालुक्यातील चिंचेवाडी गावच्या पोपटराव वायभासे या तरुणाने आत्महत्या केली होती. या निमित्त जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी वायभासे कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. तसेच पोपटराव वायभासे यांच्या कुटुंबाची आणि मुलांच्या शिक्षणाची जबाबदारी घेणार असल्याचे धनंजय मुंडे यांनी सांगितले.

निवडणुकांमध्ये जय - पराजय होत असतात मात्र या विवंचनेतून कोणी आपला जीव गमवावा, ही आमच्या मनात अपराधीपणाची भावना उत्पन्न करणारी बाब आहे. कुटुंबासाठी देखील हे कधीही न भरून निघणारे मोठे दुःख आहे, त्यामुळे संयमाने जय-पराजय घ्यावेत. कोणतीही निवडणूक अंतिम नसते. कुणीही टोकाचा निर्णय घेऊ नये,' अशा शब्दात यावेळी धनंजय मुंडे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. दरम्यान, मयत पोपटराव यांस एक मुलगा, मुलगी व पत्नी असा परिवार आहे. या संपूर्ण परिवाराची तसेच दोन्ही लेकरांच्या शिक्षणाची जबाबदारी आपण घेत असल्याचे धनंजय मुंडे यांनी सांगितले. दोन्ही मुलांच्या नावे प्रत्येकी अडीच लाख रुपयांची मुदत ठेव देखील धनंजय मुंडे यांच्या वतीने पोपटराव यांच्या मुलांना देण्यात येत आहे. यावेळी शिवा शेकडे, सुधीर भाऊ पोटे, प्रदीप वायभासे, सचिन वायेभासे, सचिन घुले, प्रा कैलास वायभासे, विलास वायभासे, युवराज वायभासे देवळली चे सरपंच पोपट शेकडे, गंगादेवी चे सरपंच विठ्ठल नगरगोजे, दत्तू शेकडे आदी उपस्थित होते.

## एलसीबी आणि वाहतूक विभागासाठी होणार प्रवेश परीक्षा

**सातारा :** पोलीस अधीक्षक समीर शेख यांनी स्थानिक गुन्हे शाखा आणि वाहतूक विभाग यांच्या माध्यमातून जिल्ह्यात स्मार्ट पोलिसिंग व्हावे यासाठी या दोन विभागासाठी प्रवेश परीक्षा घेण्याचे धोरण निश्चित केले आहे. या निर्णयामुळे फिट आणि डॅशिंग पोलीस अधिकारी व कर्मचारी गुन्हा उघडकीस आणणे व वाहतूक नियंत्रण या दृष्टीने चमकदार कामगिरी करतील अशी अपेक्षा आहे.



सध्या सातारा पोलीस दलामध्ये बदलांचे वारे सुरू आहे. गेल्या दोन दिवसापासून पोलीस बदल्याचे गॅझेट प्रसिद्ध होण्याच्या दृष्टीने येथील शिवतेज हॉलमध्ये पोलीस अधीक्षक समीर शेख कर्मचाऱ्यांशी संवाद साधत त्यांना बदली प्रक्रियेची माहिती देत आहेत गुरुवारी पोलीस बदली असणाऱ्या कर्मचाऱ्यांना शिवतेज हॉल येथे बोलवण्यात आले होते त्यानुसार पोलिसांची लगबग सुरू होती. साधारण तीन दिवस ही प्रक्रिया राबवली जात आहे .या सर्व बदलांच्या प्रक्रियेमध्ये एलसीबी व ट्रॅफिक विभागात जाण्यासाठी कायमच चढाओढ असते अनेक पोलिसांचे प्रयत्न या निमित्ताने होताना दिसतात . दोन्ही विभागात सक्षम पोलीस जावेत यासाठी पोलीस अधीक्षक समीर शेख यांनी संबंधित दोन्ही विभागात जाणाऱ्या इच्छुकांसाठी प्रवेश परीक्षा घेतली होती ती परीक्षा यंदाही घेतली जाणार आहे. त्यानुसार लेखी व मैदानी चाचणी अशा दोन्ही पातळ्यांवर पोलीस कर्मचाऱ्यांना पास व्हावे लागणार आहे या निर्णयाचे पोलीस दलातून स्वागत होत आहे

ज्या पोलिसांची क्षमता आहे त्यांची तेथे वर्णी लागत आहे .संपूर्ण जिल्हा कार्यक्षेत्र असणारे स्थानिक गुन्हे शाखा ही पोलीस अधीक्षकांची स्वतंत्र तपास यंत्रणा समजली जाते . तसेच या यंत्रणेचा वचक आणि धाक मोठा असतो. या विभागाचे पोलीस अधिकारी आणि कर्मचारी गुन्हे उघडकीस आणण्याच्या दृष्टिकोनातून स्मार्ट पोलीसिंग करतात त्यामुळे या विभागांमध्ये असणारी स्पर्धा लक्षात घेता समीर शेख यांनी प्रवेश परीक्षेचे आयोजन केले आहे. एका पोलीस ठाण्यात किंवा विभागात ज्या पोलिसांची पाच वर्षे सेवा झाली आहे अशा पोलिसांच्या बदल्या सुरू आहेत . या बदल्यांचे गॅजेट मे महिन्यातच होते मात्र लोकसभा निवडणूक प्रक्रियेमुळे गॅझेट प्रसिद्धी लांबली होती. पोलीस महासंचालकांनी राज्य पोलीस दलाला त्याबाबतचे आदेश दिल्यानंतर बदल्यांची लगबग सुरू झाली आहे साधारण २८० कर्मचाऱ्यांच्या बदल्या होणार असून त्याचे गॅझेट लवकरच प्रसिद्ध होणार आहे.

# रोहित पवारांचे पक्ष संघटनेकडे बोट

**अहमदनगर :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाने आपला २५ वा वर्धापन दिन सोमवारी सायंकाळी नगरमध्ये धुमधडाक्यात साजरा केला. मात्र, या कार्यक्रमात पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांच्या एका वक्तव्यामुळे त्यांच्यातील आणि आमदार रोहित पवार यांच्यातील मतभेदाची चर्चा पुन्हा सुरू झाली आहे. 'माझी मुदत किती महिने राहिली, ते मोजत बसू नका, मी नोव्हेंबरमध्ये स्वत:च नमस्कार करणार आहे, असे पाटील म्हणाले. यावरून ही चर्चा सुरू झाली.



गेल्या काही काळापासून आमदार रोहित पवार आणि पाटील यांच्यात सुप्त संघर्ष सुरू असल्याची पक्षात चर्चा सुरू आहे. याच दरम्यान जळगावच्या रावेरे लोकसभा मतदारसंघातील निकालावरून पवार यांनी ट्विट केले होते. त्यातून त्यांनी पक्ष संघटनेवर टीका केली होती. नगरच्या सभेत पाटील यांनी जे वक्तव्य केले, ते याच अनुषंगाने असल्याचे सांगण्यात येते. या सभेत जयंत पाटील म्हणाले, 'काही लोक माझ्या अध्यक्षपदासंबंधी महिने मोजत आहेत. मात्र, मला केवळ चारच महिने द्या. मी राज्यात सरकार आणून दाखवितो. त्यानंतर मी स्वत:च नमस्कार करीन. लोकसभा निवडणुकीतील हा विजय सर्वांचा आहे. कोणी एकाने श्रेय घेऊ नये. माझ्याबाबत काही तक्रार असेल, तर थेट शरद पवार यांच्याकडे करा, उगाच ट्विट करून ती जाहीरपणे मांडू नका. काही चुका असतील तर कानात येऊन सांगा. पक्ष कुणाच्या एकाच्या मालकीचा नाही. मात्र, माझी चूक असल्यास शरद पवार देतील ती शिक्षा मी भोगेल', असेही पाटील म्हणाले होते. पाटील यांचा रोख कुणाकडे होता याबाबत चर्चा सुरू असताना तो आमदार पवार यांच्याकडे असल्याचेही सांगण्यात येते. निवडणूक निकालानंतर रावेरमधून पराभूत झालेले राष्ट्रवादीचे उमेदवार श्रीराम पाटील यांची आमदार रोहित पवार यांच्याशी मुंबईत भेट झाली होती. त्यासंबंधी एक्सवर पोस्ट करून आमदार रोहित पवार यांनी म्हटले होते, 'राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी-शरदचंद्र पवार' पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांनी प्रत्येक मतदारसंघात जीवतोड मेहनत घेतली. आदरणीय पवार साहेबांनीही या वयात प्रत्येक मतदारसंघात प्रचारसभा घेतल्या, परंतु काही मतदारसंघात पदाधिकाऱ्यांनी काम न केल्याचं दिसून आलं आणि यामध्ये रावेर मतदारसंघाचाही समावेश होतो. या मतदारसंघात श्रीराम पाटील यांनी चांगली लढत दिली मात्र संघटनेकडून आवश्यक ती ताकत न मिळाल्याने त्यांना यश आलं नाही.' ही पोस्ट हा संघर्ष पुन्हा उफाळून येण्यामागील कारण असल्याचे सांगण्यात येते. पाटील यांनी केलेल्या वक्तव्यावर ज्येष्ठ नेते शरद पवार यांनीही आपल्या भाषणातून काहीही मत व्यक्त केले नाही. तर पाटील यांचे हे वक्तव्य म्हणजे त्यांची राजीनाम्याची तयारी, असा अर्थ काढता येणार नाही, असे खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी म्हटले आहे.

## सातारा शहरात आणखी दोन जाहिरात फलकाची दिमाखदार उभारणी

**सातारा :** एखाद्या गोष्टीमुळे जर अपघात घडला की त्याबाबत सावधानता बाळगली जाते. आपत्ती व्यवस्थापन समितीने काळजी घेण्याची अनेक सल्ले दिलेले आहेत. पण ,सध्या सातारा शहरातील जरंडेश्वर नाका परिसरात महामार्ग नजीक दोन मोठे जाहिरात फलक दिमाखदार पणे उभारण्याचे काम युद्ध पातळीवर सुरू आहे. यामुळे साताऱ्यातील जाहिरात फलकाचे स्ट्रक्चरल ऑडिट पूर्ण होण्यापूर्वीच आणखीन दोन जाहिरात फलकाची भर पडल्याची चर्चा सुरू झालेली आहे. सातारा शहराच्या वैभववात भर पडावी. लोकांना त्याचा फायदा व्हावा. या दृष्टीने उपाययोजना करणे गरजेचे आहे. मात्र, सध्या सातारा नगरपालिका म्हणजे लोकांच्या नागरी सुविधांपेक्षाही इतर गोष्टींमध्येच अधिक रस असणारी महाराष्ट्रातील मोठी ग्रामपंचायत असे त्याचे वर्णन केले जाते. याला कारणे सुद्धा अनेक आहेत. त्याबाबत सातारा शहर सुधार समिती नेहमीच खुलासा करीत असते. मुंबई येथे दिनांक १३ मे २०२४ रोजी दुपारी वादळ वाऱ्याच्या पावसामुळे घाटकोपर नजीक पेट्रोल पंपा जवळ असलेला अनाधिकृत जाहिरात फलक कोसळून १४ जणांचा मृत्यू झाला. अनेक जण गंभीर जखमी झाले. आजही त्यांच्या वेदना कमी झालेल्या नाहीत. १६ मे रोजी मोशी जय गणेश साम्राज्य चौकात ३० बाय ३० फूट आकाराचा जाहिरात फलक साडेचार वाजता कोसळून दोन वाहनांचे प्रचंड नुकसान झाले.